**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

**विषय क्रमांक : १२** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.डॉ.प्रभास माणिकराव पाटील रा.बालिकाश्रम रोड,प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.४३ बील क्रमांक Z१४३०४४५५६ या मालमत्तेवर एकच नळकनेक्शन व ओपन प्लॉटचे दुबार बील येत असल्याने बील रद्द करुन वॉर्ड नं.४३ बील नं.२३१ Z१४३०४४५५६ निर्लेखित करणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभाग

वरील विषयान्वये वॉर्ड क्र.४३ चे वसुली लिपीक यांजकडुन विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यात येतो की,डॉ.प्रभास माणिकराव पाटील रा.बालिकाश्रम रोड ,अहमदनगर यांनी इकडील कार्यालयास अर्ज देवून असे कळविले आहे की,आम्हाला पुर्वी मालमत्ता क्र.४३/२३१ z १४३०४४५५६ या नंबरने ओपन प्लॉटचे बिल येत होते.सदर ओपन प्लॉटवर आम्ही हॉस्पीटल व राहण्यासाठी बांधकाम केले व त्या बांधकामास दि.०१/०४/२०१३ पासुन मालमत्ता कर आकारणी केली आहे.त्यास मालमत्ता क्र.४३/२३१ z १४३०००१५३ असा नंबर देण्यात आला आहे.यामध्ये एक नळाचे वाणिज्य बिल देखील येते.एकाच मालमत्तेचे व एकाच नळाचे बिल दोन प्रकारे येतात.तरी बिल क्र.४३/२३१ z१४३०४४५५६ एक नळाचे व ओपन प्लॉटचे बिल रद्द करून मिळावे अशा स्वरूपाची मागणी केली आहे.

सदर अर्जदार यांच्या अर्जानुसार दि.७/९/२०२१ रोजी समक्ष जागेची तत्सम कागदपत्राची व संगणकीय करप्रणालीची पडताळणी केली असता मालमत्ता क्र.४३/२३१ z१४३०४४५५६ या बिलावर ओपन प्लॉट व वाणिज्य नळाचे बिल दिसुन येते व त्याची एकुण थकबाकी रू.२०८५९१/- + व्याज इतके आहे.या ओपन प्लॉटवर मालमत्ताधारक यांनी राहण्यासाठी व हॉस्पीटलसाठी बांधकाम केले आहे.व सदर बांधकामास १/४/२०१३ पासुन कर आकारणी करण्यात आली आहे.व त्यास मालमत्ता क्र.४३/२३१ z१४३०००१५३ असा नंबर देण्याता आला आहे.सदर बिलामध्ये वाणिज्य वापरानुसार एक नळ कनेक्शनआहे.अर्जदार हे सदरचे बिल वेळेनुसार भरतात तरी बिल क्र.४३/२३१ z१४३०४४५५६ ओपन प्लॉट व नळाचे डबल जाणारे बिल थकबाकी रू.२०८५९१/- + शास्ती सह रद्द करणेसाठी पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,सादर,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक डॉ.प्रभास माणिकराव पाटील यांच्या मालकीच्या मोकळया भुखंडावर हॉस्पीटलचे बांधकाम करण्यात आलेले आहे व त्यास नियमा नुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापासुन कर आकारणी करण्यात आलेली आहे.परंतु ज्या ओपन प्लॉटवर हॉस्पीटलचे बांधकाम करण्यात आले त्याच ओपन प्लॉटच्या बिलाची आकरणी चालू असल्याने एकाच मालमत्तेला बांधकाम दराने व ओपन प्लॉट दराने दोन बिले अदा करण्यात येत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २०(१) (क) अन्वये ओपन प्लॉटचे बिल पाणीपट्टीसह रद्द करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार ओपन प्लॉटची आकारणी रद्द करणे उचित वाटते.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,१) प्रस्तावा सोबत पाणी पुरवठा विभागाचा अहवाल जोडलेला नाही.२) सन २०१३-१४ पासुन हॉस्पीटलला आकारणी केली तो पर्यात २०१२-१३ पर्यत ओपन प्लॉटची पट्टी भरलेली आहे काय?३) शास्ती साठी नियम ५१ नुसार व थकबाकी निर्लेखीत साठी कलम १५२ नुसार सादर करा.

यावर कर निरिक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर,१) प्रस्तावा सोबत पाणी पुरवठा फिटर यांचा अहवाल जोडण्यात आला आहे.

२) सन २०१२-१३ अखेर ओपन प्लॉटचा कर भरण्यात आलेला आहे.३) शास्ती माफी करिता महानगरपालीका अधिनियम १९४९ मधील कलम ५१नुसार मा.आयुक्त साहेब यांना अंशतः अथवा पुर्ण शास्ती माफीचे अधिकार असल्याने रूपये इतकी रूपये १४४२०/- सन २०२०-२०२१ अखेर व सन २०२१ -२०२२ कमी करण्या करिता आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक कर निर्धारण व संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की,दिनांक ३०/१२/२०२१ रोजी म्यु.फिटर यांचे अहवाला नुसार सदर मिळकती मध्ये १/२" नळ कनेक्शन (वाणिज्य) आहे.तरी सदर ओपन प्लॉट वर हॉस्पीटल बांधलेले आहे.हॉस्पीटलचे बांधकामावर नविन कर आकारणी केलेली आहे.तरी पुर्वीचे ओपन प्लॉटचे बिलावरील शास्ती माफी मनपा अधि.१९४९ मधील कलम ५१ नुसार मा.आयुक्त साहेब यांना असल्याने तसेच सदर बीलावरील रक्कम निर्लेखित करण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,शास्तीची रक्कम व निर्लेखित करावयाची रक्कम किती आहे?यानुसार सादर करा.

यावर वसुली लिपीक यांचा अभिप्राय की,शास्तीची रक्कम रू.४४९३०/- व निर्लेखीत करावयाची रक्कम रू.२०८५९१/- एवढी आहे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्याप्रमाणे शास्तीची रक्कम माफ करणे साठी मा.आयुक्त यांचेकडे व निर्लेखित करावयाचे रक्क्म रू.मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"A" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.डॉ.प्रभास माणिकराव पाटील रा.बालिकाश्रम रोड,प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.४३ बील क्रमांक Z१४३०४४५५६ या मालमत्तेवर एकच नळकनेक्शन व ओपन प्लॉटचे दुबार बील येत असल्याने बील रद्द करुन वॉर्ड नं.४३ बील नं.२३१ Z१४३०४४५५६ निर्लेखित करणे बाबत ऑफीस रिपोर्ट आहे.

मा.सभापती साहेब :- ई - निविदे बाबत छाननी समिती च्या कार्यपध्दती बाबतची माहिती सांगा.

उपायुक्त (सा) श्री.कुरे :- एखादया कामासाठी निविदा मागविल्यावर किमान तीन निविदा येणे गरजेचे असते.

मा.सभापती साहेब :- परंतु आपण आत्तापर्यत केवळ दोन निविदा आल्या तरी आपण त्या उघडतो व अंतिम करतो.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑनलाईन निविदा भरताना काही कागदपत्रे अपलोड होत नाहीत.त्यामुळे निविदा ऑफलाईलन भरल्या जाव्यात.ठेकेदारांना दरवेळी विविध कागदपत्रे आणण्यास सांगितले जाते.एकदाच त्यांच्याकडून सर्व कागदपत्रे घेण्यात यावी.

शहर अभियंता श्री.इथापे :- महानगरपालिकेच्या निविदा कोणीही बाहेरचे ठेकेदार भरीत नाहीत.येथीलच सर्वजन आहेत.त्यांना कोणती कागदपत्रे लागतात हे माहित आहे.त्यानुसार त्यांनी परिपुर्ण प्रस्ताव भरावेत.

मा.सभापती साहेब :- छाननी समितीच्या बैठकीमध्ये निविदा कागदपत्रांच्या त्रुटी काढल्या जातात.छाननी समितीच्या बैठका वेळेवर होत नाहीत.त्यामुळे कामे लांबणीवर पडतात.मा.शासनाकडून निधी आणणे सोपे आहे का?शहराच्या विकासासाठी आम्ही नेत्यांकडे पाठपुरवा करून निधी आणतो.येथे छाननी समितीमध्ये त्रुटी काढल्या जातात.अधिका-यांनी सी.एम. किंवा डि.सी.एम.यांच्या कडे जावून १०० -२०० कोटींचा निधी आणून दाखवा.त्यातुन करावयाच्या कामासाठी काय लावायचे ते नियम लावा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेने कचरा संकलन करणे करीता ठेका दिलेला आहे.परंतु सध्या शहरामध्ये अनेक ठिकाणी रस्त्यांच्या कडेला कच-याचे ढिग साचलेले दिसतात.अनेक ठिकाणी कचराकुंडीच्या ठिकाणी कच-याचे मोठ मोठे ढीग झाले आहेत.कचरा संकलन करणा-या गाडया घरोघर जावून कचरा संकलन करीत नाही.घनकचरा विभागाचे नियंत्रण ठेकेदारावर राहिलेले नाही.

मा.श्री.समद खान :- ठेकेदार फक्त हॉटेलवाल्यांचा कचरा संकलन करतात.कारण ते पैसे देतात.

प्र.घनकरचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.देशमुख :- हॉटेलवाल्यांकडे चौकशी केली असता,ते पैसे दिल्याचे कबुल करीत नाहीत.त्यामुळे कारवाई करता येत नाही.

मा.सभापती साहेब :- कचरा संकलन करणा-या ठकेदार संस्थेला कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी.वॉर्ड मधील केअर टेकर यांनी त्यांच्या वॉर्ड मधिल कच-याचे फोटो काढून मा.आयुक्त व उपायुक्त यांच्या मोबाईलवर टाकावे.

मा.सभापती साहेब :- मी नुकतीच वर्तमानपत्रामध्ये पिंपळगांव माळवी येथे महानगरपालिकेच्या जागेमधील झालेल्या वृक्षतोडीबाबतची बातमी वाचली आहे.या बाबत असे समजते की,आपण फक्त चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.वृक्षतोडीची पाहणी करण्यास गेलेल्या महानगरपालिकेच्या कर्मचारी व साक्षीदारांवर तेथील काहीजण धावून आल्याने त्यांच्या विरूध्द सरकारी कामात अडथळा आणल्याचा तसेच पर्यावरण हानी केल्याचा ,नैसर्गिक साधन संपत्तीचे नुकसान आदींसह कलमांन्वये गुन्हा दाखल होण्यासाठी पुरवणी जबाब नोंदवला जावा. त्यासाठी मनपा पॅनेलवरील वकीलांची मदत घेतली जावी. व वृक्षतोडीचा गुन्हा दाखल करताना मनपाच्या पॅनलवरील एकही वकील मनपा कर्मचा-यासमवेत नव्हता.अनेकांना फोन करूनसुध्दा त्यांनी टाळाटाळ केली.या वकीलांना आपण मनधन देवून कशासाठी पोसतो ? महानगरपालिकेची मा.महासभा व मा.स्थायी समितीच्या सभेस येणे अपेक्षित आहे.ज्यांना येण्यास जमनार नाही त्यांनी पॅनलचा राजीनामा दयावा.मा.आयुक्त साहेब यांना सभेसाठी उपस्थीत रहाणे बंधन कारक नाही.परंतु त्यांनी किमान दोन ते तीन सभांनंतर एखादया सभेस उपस्थीत रहाण्यास काय हरकत आहे.सदस्यांचे काय प्रश्न आहेत.कोणत्या अडचणी आहेत. हे समजावून घेतल्या पाहिजेत.

मा.श्री.रविंद्र बारस्कर:- पिंपळगांव माळवी येथील महानगरपालिकेच्या जागेमध्ये सध्या असलेल्या दिड-दोन हजार वृक्षांच्या रक्षणासाठी महानगरपालिकेने स्वतंत्र्य यंत्रणा लावावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणी पट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री.डॉ.प्रभास माणिकराव पाटील रा.बालिकाश्रम रोड,प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.४३ यांना ओपन प्लॉटवर हॉस्पीटल व राहण्यासाठी बांधकाम केले व त्या बांधकामास मालमत्ता कर आकारणी झाली आहे परंतु बील क्रमांक Z१४३०४४५५६ या मालमत्तेवर नळकनेक्शन व ओपन प्लॉटचे दुबार बील येत असल्याने सदचे बील रद्द करुन वॉर्ड नं.४३ बील नं.२३१ Z१४३०४४५५६ व त्या वरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

**विषय क्रमांक : १३** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.नितीन नामदेव भारताल,रा.सुडके मळा, बालिकाश्रम रोड, प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड नं.४३ बील क्रं.३५४(Z१४३२२४४६८६) व ३५४/१(Z१४३०४४६८७ ) या मालमत्तेवर एकाच नळाचे दोन बील येत असल्याने वॉर्ड नं.४३ बील नं.३५४/१ (Z१४३०४४६८७ ) हे बील निर्लेखित करणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभाग

**संदर्भ :-** श्री.नितीन नामदेव भारताल,रा.सुडके मळा,बालिकाश्रम रोड,अहमदनगर

वरील विषयान्वये वॉर्ड क्र.४३ चे वसुली लिपीक यांज कडून विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यात येतो की,श्री.नितीन नामदेव भारताल रा.सुडके मळा ,बालिकाश्रम रोड,अहमदनगर यांनी इकडील कार्यालयास दिनांक २२/१२/२०२१ रोजी अर्ज देवून असे कळविले आहे की,मला आपल्या मालमत्ता कराचे बिल वॉर्ड क्र.४३ बिल क्र.४३/३५४ z १४३०४४६८६ ने सर्व करांसहीत येते त्यात पाणीपट्टीचे बिल देखील येते.तसेच वॉर्ड क्र.४३ बिल क्र.३५४/१ z १४३०४४६८७ हे पाणीपट्टीचे जादा बिल येते.तरी वॉर्ड क्र.४३ बिल क्र.४३/३५४/१ z १४३०४४६८७ हे जादा येणारे पाणीपट्टीचे बिल रद्द करून मिळावे अशा स्वरूपाचा अर्ज दिलेला आहे.

सदर अर्जदार यांच्या अर्जानुसार दिनांक २४/१२/२०२१ रोजी समक्ष जागेची स्थळ पहाणी तसेच संगणकीय प्रणालीची व तत्सम कागदपत्रांची पडताळणी केली असता अर्जदार यांना मालमत्ता कराचे व पाणीपट्टी कराचे बिल क्र ४३/३५४ z १४३०४४६८६ ने नियमानुसार जाते.व ते नियमीत प्रमाणे बिल भरतात.त्यांना जाणारे जादा नळजोडाचे बिल क्र.४३/३५४/१ z १४३०४४६८७ ह रद्द करणे उचित वाटते.पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक नितीन नामदेव भारताल यांना एकाच मालमत्तेचे दोन नळ कनेक्शन असल्याचे बिल अदा करण्यात येत आहे.तरी जादा नळजोड असलेले पाणीपट्टीचे बिल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २०(१) अन्वये रद्द करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच मनपा फिटर यांचा प्रत्यक्ष पहाणी अहवाल व वसुली लिपीक यांचा प्रस्तावा नुसार चुकीची नळ कनेक्शन ची लागलेली नोंद कमी करणे उचित वाटते.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक नितीन नामदेव भारताल यांच्या मालमत्तेस दोन नळकनेक्शन असल्याचे बिल करण्यात येत आहे.जादा नळजोड असलेले पाणीपट्टीचे बिल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम (२०) (क) अन्वये रद्द करणे तसेच कलम ५१ अन्वये शास्ती कमी करणे बाबत मा.आयुक्त साहेब यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.तसेच सदर थकबाकी निर्लेखित करण्याचे अधिकार कलम १५२ अन्वये मा.स्थायी समितीस असून पुढील आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुार नळ कनेक्शनची नोंद कमी करणे उचित वाटते.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,अर्जदार यांचे अर्जानुसार पाणीपुरवठा विभागाचे अभिप्राया नुसार एकाच नळ कनेक्शन असल्याने विभागाने सादर केलेल्या प्रस्ताव "अ" नुसार मा.स्थायी समितीपुढे निर्लेखित साठी पाठविणे उचित होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" व "ब " प्रमाणे निर्लेखित करणे करीता मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) "अ" व "ब " मान्यतेसाठी स्थायी समितीकडे सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्र.१३ नुसार चर्चा

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणी पट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री.नितीन नामदेव भारताल,रा.सुडके मळा, बालिकाश्रम रोड, प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड नं.४३ बील क्रं.३५४(Z१४३२२४४६८६ व ३५४/१ (Z१४३०४४६८७ ) या मालमत्तेवर एकाच नळाचे दोन बील येत असल्याने वॉर्ड नं.४३ बील नं.३५४/१ (Z१४३०४४६८७ ) हे बील व त्यावरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**विषय क्रमांक : १४** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार गौरव अशोक सुडके, रा. सुडके मळा, बालिकाश्रम रोड,अ.नगर प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड नं.४३ बील क्रं.४३/४३१/सी पडीक मालमत्तेचे बील रद्द करुन रककम निर्लेखित करणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभाग

वरील संदर्भिय विषयान्वये वॉर्ड क्र.४३ मधील वसुली लिपीक यांजकडून विनंतीपुर्वक रिपोर्ट देण्यात येतो की,वॉर्ड क्र.४३ मधील बिल क्र.४३/३४१ /सी मालमत्ताधारक कै.प्रभाकर हरी सुडके (कै.अशोक सुडके ) यांचा मुलगा गौरव अशोक सुडके रा.सुडके मळा,बालिकाश्रम रोड अहमदनगर यांनी इकडील कार्यालयास अर्ज देवून असे कळविले आहे की,आमच्या आजोबांच्या व वडिलांच्या नांवे वॉर्ड क्र.४३ बिल क्र.४३/३४१/सी या क्रमांकाने पडीक माती विटा पत्रा असे तीन रूम पडीक होते.सदर तीन रूम हे पुर्वीपासुन पडीक होते.सन २००४ पासुन ते आम्ही सर्व जमीनदोस्त केले आहे.परंतु सदर जमीनदोस्त केलेल्या पडीक तीन रूमची घरपट्टी आम्हाला आजपर्यत येते.ती आम्हाला मान्य नाही.तरी आपल्या विभागामार्फत तपासणी करून सदर बिल रद्द करण्यात यावा.अशा स्वरूपाची मागणी केलेली आहे.

अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे दिनांक १५/१२/२०२० रोजी समक्ष जागेची पहाणी व तत्सम कागदपत्रांची पडताळणी केली असता परिशिष्ठ अ पाहता बिल क्र.४३ /३४१/सी मध्ये पडीक तीन रूम ची नोंद दिसुन येते.प्रत्यक्ष जागेवर देखील सदर तीन रूम अनेक वर्षापासून दिसुन येत नाही.तसेच सदरची जागा ही शेतजमीन आहे.तरी अर्जदार यांचे म्हणणे रास्त असून बिल क्र.४३/३४१/सी z १४३००४४६७२ या बिलावरील आजअखेर घरपट्टीची थकबाकी रूपये ४२,८८३/- + शास्ती (रद्द) निर्लेखित करण्यास पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक प्रभाकर हरि सुडके यांची मालमत्ता पडीक असून संपुर्ण जमीनदोस्त करण्यात आली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये सर्व रक्कम थकबाकी सह निर्लेखीत करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, १. पहाणी अहवालासह ठेवा २.नविन उतारा

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर,मागणी नुसार पहाणी अहवाल सोबत जोडण्यात आलेला आहे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार मालमत्ता निर्लेखित करणे उचित वाटते.

यावर रिव्हीजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचे जागा पाहणी अहवाला नुसार सदर जागेवरील रूम जमीनदोस्त करण्यात आलेले असल्याने .सदरचे बिल रद्द करणेस हरकत नाही.तथापी सदर बिला वरील शास्ती माफीचे अधिकार नियम ५१ नुसार मा.आयुक्त

यांना आहेत.तसेच थकबाकीची रक्कम निर्लेखित करण्यासाठी अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती कडे पाठविणे योग्य होईल.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मान्यतेसाठी स्थायी कडे सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,उशिरा सादर करणे कारण काय?

यावर वसुली लिपीक यांचा अभिप्राय की,फेरसादर,कोव्हीड च्या प्रर्दुभाव रोखण्यासाठी इतरत्र डयुटी लावल्या कारणाने उशीर झाला होता.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समितीसभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्र.१३ नुसार चर्चा

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार गौरव अशोक सुडके, रा. सुडके मळा, बालिकाश्रम रोड,अ.नगर प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड नं.४३ बील क्रं. बिल क्र.४३/३४१/सी z १४३००४४६७२ पडीक मालमत्तेचे बील रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२

**विषय क्रमांक : १५** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सय्यद फिरोज सय्यद चॉद प्रभाग समिती क्र.१ वसुली वॉर्ड क्र.४५सावेडी वसुली विभाग मालमत्ता क्र.Z१४५०४६८३९ या मालमत्तेवर नळजोड नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभाग

सावेडी वसुली विभागातील वॉर्ड क्र.४५ चे वसुली लिपिक यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.४५ मधील अर्जदार सय्यद फिरोज चांद यांनी पाणीपट्टीची रक्कम व नळजोड नोंद कमी करून दुरूस्त बील मिळणे बाबत दिनांक २८/०२/२०२२ रोजी लेखी अर्जाव्दारे कळविले आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर मालमत्तेची वसुली अभिलेखाची व परिशिष्ट अ ची पडताळणी केली असता सय्यद गफुर सय्यद आलम यांच्या नावाने वाणीज्य मालमत्ता कराची व पाणीपट्टी पिण्याच्या दराने नळजोड नोंद असल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच वसुली लिपिक व करनिरीक्षक यांनी सदर ठिकाणी सदर मालमत्तेची समक्ष दिनांक ५/३/२०२२ रोजी स्थळ पाहणी केली असता सदर ठिकाणी पत्रा स्वरूपाचा गाळा असून सदर ठिकाणी नळजोड नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच सावेडी पाणीपुरवठा विभागातील पाणीपुरवठा फिटर यांनी दि.०५/०३/२०२२ रोजी समक्ष जागेची स्थळ पाहणी केली असता सावेडी जा.क्र.१६९३ ने दि.५/३/२०२२ रोजी नळजोड नसल्याचे लेखी अहवालाव्दारे कळविले आहे.

सदर अर्जदार यांच्या अर्जानुसार व वसुली लिपीक यांच्या अहवालानुसार मालमत्ता क्र. .Z१४५०४६८३९ (४५-२०६) वरील सन २०२१-२२ अखेर पाणीपट्टी कर आकारणी शास्तीसह नळ जोड नोंद कायमस्वरूपी रद्द करणेबाबत संपुर्ण रक्कम व सदर अहवाल मंजूर होईपर्यत त्यावर आकारण्यात येणारी शास्ती रद्द करून त्याची नोंद वसुली अभिलेख नमुना परिशिष्ट-अ व संगणक प्रणाली मध्ये होणेबाबत उपरोक्त अहवाल मंजूरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मलमत्ता धारक श्री.सय्यद फिरोज सय्यद चांद यांच्या मालमत्तेस नळजोड नसताना पाणी पट्टीची कर आकारणी करण्यात आली आहे.मनपा फिटर यांच्या दि.४/३/२०२२ रोजी स्थळ पहाणी केली असता नळ नसल्याचे अहवालात नमुद केले असल्याने पाणीपट्टीची कर आकारणी मनपा अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये निर्लेखित करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार नळ कने.ची नोंद रद्द करणे उचित वाटते.

यावर सहाय्यक कर निर्धारण व संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केलेला प्रस्ताव "अ" नुसार मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार पाणीपट्टी कर आकारणी निर्लेखित करणेसाठी मनपा अधि १९४९ मधील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्र.१३ नुसार चर्चा

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणी पट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार सय्यद फिरोज सय्यद चॉद प्रभाग समिती क्र.१ वसुली वॉर्ड क्र.४५सावेडी वसुली विभाग मालमत्ता क्र.Z१४५०४६८३९ या मालमत्तेवर नळजोड नसतांना आकारण्यात आलेली पाणीपट्टीचे बील रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

**विषय क्रमांक : १६** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सौ.वर्षा श्रीनिवास भानप प्रभाग समिती क्र.१ सावेडी,वॉर्ड क्र.६४ बिल क्र.Z१६४०६७८९८(६४-९१) या मालमत्तेवर नळजोड नसल्याने पाणीपट्टीची केलेली आकारणी निर्लेखीत करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभाग

. सावेडी वसुली विभागातील वॉर्ड क्रमांक ६४ चे वसुली लिपीक यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.६४ मधील अर्जदार सौ.वर्षा श्रीनिवास भानप यांनी पाणीपट्टीची रक्कम व नळजोड नोंद कमी करून दुरूस्त बिल मिळणेबाबत दिनांक २५/०३/२००३ व दिनांक २३/०९/२०२१ रोजी लेखी् अर्जाव्दारे कळविले आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर मालमत्तेची वसुली अभिलेखाची व परिशिष्ट अ ची पडताळणी केली असता सौ.वर्षा श्रीनिवास भानप व श्रीनिवास संपतराव भानप यांच्या नावाने मालमत्ता कराची व १/२ " पिण्याच्या दराने नळजोड नोंद असल्याचे निदर्शनास आले आले आहे.

तसेच वसुली लिपीक व कर निरीक्षक यांनी सदर मालमत्तेची समक्ष दिनांक ११/०४/२०२२ रोजी स्थळ पहाणी केली असता सदर ठिकाणी मयुर अपार्टमेंट मध्ये १/२" एक नळजो असल्याचे निदर्शनास आले आहे व वसुली अभिलेखात सदर अजार्टमेंट मध्ये मालमत्ता क्र.Z१६४०६७८९९ १/२" पिण्याच्या दराने एक नळ जोड असून त्याचा मालमत्ता कर व पाणीपट्टी कर नियमित भरत असल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच सावेडी पाणी पुरवठा विभागातील पाणी पुरवठा फिटर यांनी दिनांक २७/०१/२०२२ समक्ष जागेची स्थळ पाहणी केली असता १/२ एक नळ जोड असल्याचे सावेडी जावक क्र.१४८५ ने दिनांक ०२/०२/२०२२ रोजी लेखी अहवालाव्दारे कळविले आहे.

तरी अर्जदार यांच्या अर्जानुसार व वसुली लिपीक यांच्या अहवालानुसार मालमत्ता क्र.Z१६४०६७८९८ वरील सन २०२२-२३ अखेर पाणीपट्टी कर आकारणी रूपये १२२१४+ त्यावरील शास्ती २७३९४ अशी एकुण रक्कम ३९६०८ व सदर अहवाल मंजूर होईपर्यत त्यावर आकारण्यात येणारी शास्ती रद्द करून त्याची नोंद वसुली अभिलेख,नमुना परिशिष्ट अ व संगणक प्रणाली मध्ये होणेबाबत उपरोक्त अहवाल मंजूरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक श्रीनिवास भानप व सौ.वर्षा श्रीनिवास भानप यांच्या मालमत्तेस एकच नळ कनेक्शन असल्याने जादा आकारणी करण्यात आलेली नळकनेक्शन Z६४०६७८९८ वरील थकबाकी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २०(१) (क) अन्वये थकबाकी रद्द करणे उचित वाटते तसेच कलम ५१ अन्वये मा.आयुक्त साहेब यांना मालमत्ता करावरील आकारण्यात आलेला दंड अथवा शास्ती ची रक्कम पुर्णत: किंवा अंशत: माफ करण्याचे अधिकार आहेत तरी शास्तीची रक्कम माफ घेणेकामी अहवाल आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच मनपा फिटर यांचा प्रत्यक्ष पहाणी अहवाल व वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार नळ कनेक्शन ची नोंद कमी करणे उचित वाटते.

यावर सहाय्यक कर निरीक्षक व संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की,अर्जदार यांचे अर्जानुसार मयुर अपार्टमेंट मध्ये अर्जदार यांचे दोन फ्लॅट असून दोन नळ कनेक्शन होते.सन २००९ मध्ये अर्ज देवून नळ कने.बंद कणे बाबतच्या अर्जा नुसार नळ कनेक्शन नळ कनेक्शन बंद केलेले असून आज पर्यत नळपट्टी चालू आहे.तरी वसुली लिपीक व पाणी पुरवठा फिटर यांचे पाहणी अहवाला नुसार १/२ " १ नळ कनेक्शन आहे.तरी विभागाने सादर केलेला प्रस्ताव "अ" नुसार मान्यतेस्तव व सादर तसेच सदर बीलावरील पाणीपट्टीची रक्कम म.न.पा.अधि.तरतुदी नुसार कलम १५२ प्रमाणे मा.स्थायी समिती कडे निर्लेखित साठी पाठविणे योग्य होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक व पाणी फिटर यांच्या पाहणी अहवालानुसार अर्जदारकडे १/२ " एक नळ कनेक्शन आहे.तरी विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार बीलावरील पाणीपट्टीची रक्कम मनपा अधि १९४९ नुसार मा.स्थायी समितीकडे निर्लेखित साठी पाठविण्यास मान्यतेस तथा आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे

यावर मा.आयुकत साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्र.१३ नुसार चर्चा

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणी पट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार सौ.वर्षा श्रीनिवास भानप प्रभाग समिती क्र.१ सावेडी,वॉर्ड क्र.६४ बिल क्र.Z१६४०६७८९८(६४-९१) या मालमत्तेवर नळजोड नसल्याने आकारण्यात आलेली पाणीपट्टीचे बील रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

**विषय क्रमांक : १७** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार वनिता प्रविण पवळ व सचिन अशोक सातपुते प्र.स.क्र.२ वॉर्ड क्र२ बिल क्र.४३९ A,B,C,D,E या मालमत्ता क्रमांकावर नविन बांधकामा होवून अपार्टमेंट झाल्याने पुर्वीची घरपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग वॉर्ड क्र.२ चे वसुली लिपीक यांचेकडुन विनंती प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.२ बिल क्र.२ नवीन बांधकाम अपार्टमेंट कर आकारणी नोंद वसुली अभिलेखा बिल क्र.४३९ ते ४३९ ABCD,E अशा प्रकारे नोंदी आहेत.

सदर बिलावरील पुर्वीचे जुने बांधकाम निष्कासित करून नविन बांधकाम केलेले असुन त्या प्रमाणे कर आकारणी नोंदी घेवून आकारणी बिले बजावणेत आलेली आहे.बिल क्र.५३९/E नांव ,रामचंद्र पवळ भो.अशोक आण्णा सातपुते,चितळे रोड व ५३९/D नांव ,रामचंद्र असाराम पवळ भो,प्रविण रामचंद्र पवळ चितळे रोड संगणक नजर चुकीने दुबार आकारणी करण्यात आलेली आहे.परंतु दुबार कर आकारणी बिल क्र.५३९/D व ५३९/E वरील कर आकाणी दुबार नोंद झाल्याने सन २०२१/२०२२ अखेर रू.५५८६३/-+ शास्ती व ७९११९/- + शास्ती थकबाकी आहे.उक्त थकबाकी वसुल न होण्याजोगी असुन बिल क्र.५३९/D नांव रामचंद्र असाराम पवळ भो., प्रविण रामचंद्र पवळ चितळे रोड व बिल क्र.५३९ E नांव रामचंद्र पवळ भो ,अशोक आण्णा सातपुते चितळे रोड या दोन्ही बिलावरील थकबाकी रू.१३४९८२/-+ शास्ती महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ११ नगरपालिका कराधान कलम १५२ नुसार वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणे मा.आयुक्त साहेब यांना स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्यांचे मते वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल सदर कलमानुसार बिल क्र.५३९/ D व ५३९ / E दोन्ही बिलावरील एकुण रक्कम २४६८३/-व ३४३०४/- अशी एकुण ५८९८७/- मा.स्थायी समितीचे मान्यतेने निर्लेखित करणेकामी तसेच बिल क्र.५३९ / D वरील शास्ती रक्कम रू.३११८०/- व बिल क्र.५३९/E वरील शास्ती रक्कम रू.४४८१५/-बाबत प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण कराधान नियम ८ कलम ५१ नुसार शास्ती फि किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल.

मा.आयुक्त साहेब यांना आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फि किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल अशी तरतुद असुन उक्त तरतुदीन्वये प्रस्ताव मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांचे प्रस्तावानुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार सादर

यावर मा.सहा.कर मुल्य निर्धारक अधिकारी यांचा अभिप्राय की,अर्जदार यांनी जुने बांधकाम पाडुन नविन अपार्टमेंट बांधलेले आहे.सादर अपार्टमेंट सहा मालमत्ता असुन इतर सहा मिळकतींना स्वतंत्र

बील जातात.संगणकावर नोंद घेतांना नजरचुकीने ५३९/E व ५३९ D हि दोन बील अतिरीक्त नोंद झाल्याने विभागाने सादर केलेला प्रस्ताव "अ " व " ब " नुसार मा.स्थायी समिती कडे निर्लेखीत व रद्द करणेसाठी पाठविणे बाबत मान्यतेस्तव सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ ब क प्रामाणे मा.स्थायी समितीकडे निर्लोखित व रद्द करणेसाठी मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, क स्थायी समिती पुढे सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्र.१३ नुसार चर्चा

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणी पट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार वनिता प्रविण पवळ व सचिन अशोक सातपुते प्र.स.क्र.२ वॉर्ड क्र२ बिल क्र.४३९ A,B,C,D या मालमत्ता क्रमांकावर नविन बांधकाम होवून अपार्टमेंट झाल्याने पुर्वीची घरपट्टीची आकारणी बिल क्र.५३९/ D व ५३९ / E दोन्ही बील रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

---

**विषय क्रमांक : १८** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार चंद्रकांत मंगलचंद कोठारी,आडते बाजार,प्र.स.क्र.२ वॉर्ड क्र.७ बील क्र.५०६ या मालमत्तेवर नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टी आकारणी झालेली असत्याने पाणीपट्टीची आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग

प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली वॉ.क्र.७ चे वसुली मदतनीस यांजकडुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की,बिल क्र.५०६ (मालमत्ता क्र.Z२७०८१७४५) घ.नं.२१९७ आडते बाजार या मालमत्तेवर चंद्रकांत मंगलचंद कोठारी या नांवे मनपा अभिलेखा नोंद आहे.अर्जदार यांनी सदर मालमत्तेवर नळ कनेक्शन नसतांना आम्हाला पाणीपट्टी येत आहे.तरी आपल्या फिटर मार्फत पाहणी करून संपुर्ण पाणीपट्टी बीलातुन रद्द करावी असे कळविले आहे.

त्यानुसार पाणीपुरवठा हेड फिटर यांनी दि.३/३/२०२२ रोजी समक्ष पाहणी केली असता त्या ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन आलेले नाही.असा रिपोर्ट दिलेला आहे.

सदर मालमत्तेवर सन २०२१-२०२२ अखेर घरपट्टीची एकुण १६३२२७ + शास्ती एवढी थकबाकी आहे.त्यामध्ये पाणीपट्टी २५५००/-एवढी थकबाकी आहे.सदरची थकबाकी ही २००५/२००६ ते २०२१-२२ अखेरची आहे.सदर जागेचा वापर हा गोडावुन म्हणून होत आहे.तरी अर्जदार यांचे अर्जानुसार संपुर्ण पाणीपट्टी रू.२५५००/-+ शास्ती हि निर्लेखित करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ५१ नुसार शास्ती माफीचे अधिकार मा.आयुक्त साहेब यांना असुन १५२ नुसार निर्लेखित करण्याचे अधिकार मा.स्थायी समितीला असल्याने मा.स्थायी समितीकडे मंजूरी करीता रिपोर्ट मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वॉ.क्र.७ मालमत्ताधारक अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्ज व पा.पु.वि.फिटर यांचे रिपोर्ट नुसार प्रस्ताव सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली मदतनीस व कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार १५२ नुसार निर्लेखित करण्यासाठी आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक कर निर्धारक व संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राया की,दि.३/३/२०२२ रोजीच्या हेड फिटर च्या रिपोर्ट नुसार नळ कनेक्शन नसल्याने विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार प्रस्ताव "अ" नुसार मा.स्थायी समिती कडे पाठविणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार मा.स्थायी समिती कडे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,विलंबाने सादर करण्याचे प्रयोजन काय ? खुलासा करावा.

यावर वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,दिनांक ३१/३/२०२२ चे शेरांकनानुसार खालील प्रमाणे खुलासा देण्यात येत आहे.मालमत्ता धारक अर्जदार यांनी दिनांक २४/२/२०२२ रोजी प्र.स.क्र.२ प्रभाग कार्यालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे.

उक्त अर्ज प्र.स.क्र.२ शहर वसुली विभागाकडे दि.१०/०३/२०२२ रोजी देण्यात आलेला आहे. मालमत्ताधारक अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जावर दि.३/३/२०२२ रोजी पाणी पुरवठा विभाग प्र.स.क्र.२ फिटर यांनी समक्ष पाहणी करून रिपोर्ट दिलेला आहे.

तद्नंतर शहर वसुली विभागा मार्फत दि.१८/३/२०२२ रोजी तात्काळ मालमत्ता धारक यांचे अर्ज व पाणी पुरवठा फिटर यांचे समक्ष स्थळ पाहणी रिपोर्ट नुसार तात्काळ कार्यालयीन पुर्तता करून प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे.

येणे प्रमाणे खुलासा सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार खुलासा सविनय सादर,तरी पाणीपट्टी निर्लेखित करणेबाबत मा.स्थायी समिती कडे पाठविणे बाबत मंजूरीस्तव सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्र.१३ नुसार चर्चा

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणी पट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री.चंद्रकांत मंगलचंद कोठारी,आडते बाजार,प्र.स.क्र.२ वॉर्ड क्र.७ बील क्र.५०६(मालमत्ता क्र.Z२७०८१७४५) या मालमत्तेवर नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टी आकारणी झालेली असल्याने सदरचे बील रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

**विषय क्रमांक : १९** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग समिती क्र.२ वसुली वॉर्ड क्र.८,१४ व २६ मधील एकुण १५ मालमत्ता धारकांचे दुबार बिलाची नोंद झाल्याने त्यावरील रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग

वॉर्ड नं.८ व २६ मधिल मालमत्ता धारकांचे थकबाकपोटी कलम २०(२) दावा क्रमांक ने नोटीस वाटत असतांना काही मालमत्ता धारकांचे बिल दुबार (डबल) झालेले आढळुन आलेले आहे. दुबार (डबल) झालेले बिलांची चौकशी केली असता काही बिलांचे जागेमध्ये नविन बांधकाम झालेले असल्याने बिल एकत्रीत आलेले आहे व काही बिल मा.उपायुक्त (कर) साहेबांचे मंजुरीने बिल एकत्रीत करण्यात आलेली आहेत.परंतु बिल एकत्रीत केल्यानंतर दुसरे बिल रद्द केल्यानंतर किंवा बिल रद्द केल्यांनतर संगणकाचे चुकीमुळे दुसरे बिल रद्द न केलेले दिसत आहे.तरी साहेबांनी दुबसर झालेले बिल खालील प्रमाणे मा.साहेबांची मंजुर फाईल प्रमाणे व नविन बांधकामाचे रिव्हीजन फॉर्म प्रमाणे एकुण १७ बिलांची एकुण शास्तीसह रक्कम रू.१०५०९०६/-निर्लेखित करणे बाबत

| अ.क्र | वॉर्ड नं. | मालमत्ता धारकाचे नांव | मा.उपायुक्त (कर) साहेबांची मंजूरी | एकत्रीत केलेले बिल नं. | एक बिल केलेले नं | रद्द करावयाचे बिल नं. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८ | सुशिला पुरूषोत्तम मोडके<br>सुलभा पुरूषोत्तम मोडके | नस्ती क्र.८१७ दिनांक १६/६/२०१३ | Z२८०८१७९४<br>Z२८०८१७९२ | Z२८०८१७९४ | Z२८०८१७९२ |
| २ | ८ | प्रदिप वसंतलाल गांधी | नस्ती क्र.१८०९/२ दि.७/२/२०२० | Z२८०८२७९२<br>Z२८०८२७९३<br>Z२८०८२७९४ | Z२८०८२७९२ | Z२८०८२७९३<br>Z२८०८२७९४ |
| ४ | ८ | सतिष उत्तमराव सुपेकर | दि.६/९/२०१२ | Z२८०८२००३<br>Z२८०८२००४ | Z२८०८२००३ | Z२८०८२००४ |
| ३ | ८ | रमेशलाल भगवानदास नागपाल | | | | |
| | | रमेशलाल भगवानदास नागपाल | | | | |
| ५ | ८ | विलास लोढा | | | | |
| | | विलास लोढा | | | | |
| | | रमेशलाल भगवानदास नागपाल | | | | |
| | | रमेशलाल भगवानदास नागपाल | | | | |
| ६ | २६ | लक्ष्मीबाई नरसय्या नल्ला | नस्ती क्र.१८६० दि.१५/१/२०१४ | Z२२६०८८९६६<br>Z२२६०८८९६७ | Z२२६०८८९६६ | Z२२६०८८९६७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २६ | डॉ.गजानन मोहीनीराज काशीद व इतर | न.बा | Z२२६०८८५९८<br>Z२२६०८८५९९ | Z२२६०८८५९८ | Z२२६०८८५९९ |
| ८ | २६ | शेख लियाकत शेख महंमद शेख समीर व नजमा महंमद शेख | न.बा | Z२२६०८८१३४<br>Z२२६०८८१३५ | Z२२६०८८१३४ | Z२२६०८८१३५ |
| ९ | २६ | चंद्रशेखर गंगाराम बाले | न.बा | Z२२६०८९१३०<br>Z२२६०८९१२९ | Z२२६०८९१३० | Z२२६०८९१२९ |
| १० | १४ | नुरानी मस्जिद व इतर | नस्ती क्र.१७८५/३ दि.१६/१/२०१८ | Z२१४०८५३७०<br>Z२१४०८५३७१ | Z२१४०८५३७० | Z२१४०८५३७१ |

| अ.क्र. | वॉर्ड नं. | बिल नं. | मालमत्ता धारकाचे नांव | शास्ती | मुळ रक्कम | एकुण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८ | Z२८०८१७९२ | सुशिला पुरूषोत्तम मोडके<br>सुलभा पुरूषोत्तम मोडके | ३१२६० | ५०१४४ | ८१४०४ |
| २ | ८ | Z२८०८२७९४ | प्रदिप वसंतलाल गांधी | ३८९० | १३१५४४ | १३५४३४ |
| ३ | ८ | Z२८०८२००४ | सतिष उत्तमराव सुपेकर | २२५८२ | २६४३० | ४९०१२ |
| ३ | ८ | Z२८०८२२८२ | रमेशलाल भगवानदास नागपाल | १९४३ | २७३८८ | २९३३१ |
| ५ | ८ | Z२८०८२२८३ | रमेशलाल भगवानदास नागपाल | १९४३ | २७३८८ | २९३३१ |
| ६ | ८ | Z२८०८२२८४ | विलास लोढा | २०४४ | २८४४० | ३०४८४ |
| ७ | ८ | Z २८०८२२८५ | विलास लोढा | २३४० | ३३०२५ | ३५३६५ |
| ८ | ८ | Z२८०८२२८७ | रमेशलाल बी नागपाल | २३५२ | ३३२१९ | ३५५७१ |
| ९ | ८ | Z २८०८२२८८ | रमेशलाल बी नागपाल | २३५२ | ३३२०९ | ३५५६१ |
| १० | | Z२२६०८८२८९ | सय्यद सोहेल अंजुम | ३४ | ११८६ | १२२० |
| ११ | | Z२२६०८८९६७ | लक्ष्मीबाई नरसय्या नल्ला | २२९७७ | ३११६७ | ५४१४४ |
| १२ | | Z२२६०८८५९९ | डॉ.गजानन मोहीनीराज काशीद व इतर | वसुल झालेले आहे | ० | ० |
| १३ | | Z २२६०८८१३५ | शेख लियाकत शेख महंमद शेख समीर व नजमा महंमद शेख | १००४९ | १३०४४ | २३०९३ |
पगारे राहुल मळुजी यांचे मालमत्तेची नोंद १) वॉर्ड नं.२८ मध्ये असून त्याचा बिल नं. Z४२८१०९६०० जुना बिल नं २१३ निवासी जागा आहे २) वॉर्ड नं.२८ बिल नं. Z४२८११०१०८ जुना बिल नं.६९१ मोकळी जागा या प्रमाणे दोन मालमत्तांची नोंद आहे.अर्जदाराचे अर्जानुसार सदरील जागेची समक्ष पहाणी कली असता अर्जदाराची एकच मिळकत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.म.न.पा.चे मालमत्ता रजिष्टरला नजर चुकीने दोन मिळकतींची नोंद झालेली आहे.सदर मोकळया जागेचे कयोर्य मुल्य २५११ असे आहे.

अर्जदाराने दोनही मिळकतींचेपैकी बिल नं. Z४२८१०९६०० वरील मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा केलेला आहे.

प्रत्यक्ष पहाणी अहवालात एकच मिळकत असल्याने बिल नं. Z४२८१०९६०० हे बिल तसेच ठेवून झालेल्या डबल नोंदीचे बिल नं. Z४२८११०१०८ हे शास्तीसह रद्द होणेस तसेच सदर बिलावरील सन २०२१-२०२२ अखेर मालमत्ता कर व इतर कराची एकुण थकबाकी रक्कम रू.७५५०४/-+शास्ती ही वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १५२ अन्वये निर्लेखित करणेस मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक ,करनिरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार तसेच अर्जदाराचे अर्जा नुसार महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये संबंधित मालमत्ताधारकाची झालेली डबल नोंद रदद करून थकबाकी रक्कम रूपये ७५५०४/-+ शास्ती निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक मुल्य निर्धारक तथा करसंकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केलेल्या प्रस्ताव "अ" नुसार मान्यतेस सादर.

यावर मा.सहा.आयुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे मा.स्थायी समितीपुढी ठेवणेबाबत आदेशार्थ सादर.

यवर मा.उपायुक्त (कर) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्र.१३ नुसार चर्चा

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणी पट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार पगारे विलास मळूजी प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांव वॉर्ड क्र.२८ बील क्रमांकZ४२८१०९६०० व Z४२८११०१०८ या प्रमाणे एकाच मालमत्तेचे दोन बिले असल्याने Z४२८११०१०८ हे बील रद्द करुन त्यावरील रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

**विषय क्रमांक : ३०** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.दिपक सुर्यकांत कुलकर्णी प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.४ बिल क्र.६०२ यांचे मालमत्तेमध्ये शासकिय कार्यलयास भाडे तत्वाने देण्यात आले होते.सदर कार्यालय स्थलांतरीत झाल्याने सदर मालमत्तेवर करण्यात आलेली भाडे आकारणी निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४

प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड नं १८चे वसुली यांजकडुन विनंती प्रस्ताव देण्यात येतो की,वॉर्ड नं.१८ बिल नं.६०२ मालमत्ता धारक अर्जदार किरण सुर्यकांत कुलकर्णी यांनी संदर्भन्वये महानगरपालिकेकडे अर्ज दाखल केलेले आहेत.

अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार वसुली अभिलेखा पडताळणी केली असता बिल नं ६०२ वर दिपक सुर्यकांत कुलकर्णी या नांवे वसुली अभिलेखा नोंद आहे.सदर मिळकतीमध्ये सन २००७-२००८ पर्यत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा शासकीय कार्यालयास भाडे तत्वावर दिले होते.

सदर कार्यालयाने सन २००७/२००८ अखेर कराचा भरणा केलेला असुन जिल्हाग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाने दि.३१/५/२००८ पासुन जागा मालक दिपक कुलकर्णी यांचे जागा ताब्यात दिलेली असुन तसे ताबा दिले बाबतचे संबंधीत कार्यालयाने पत्र अर्जासोबत झेरॉक्स प्रत जोडली आहे.

तसेच सदरचे मिळकतीमध्ये एकात्मीक बाल सेवा योजना नगर (ग्रामीण) शासकीय कार्यालय भाडे तत्वावर देण्यात आले होते.सदर कर्यालयाने सन २००७/२००८अखेर म्हणजे दि.३०/०९/२००७ पर्यत मनपा कर अदा केल्याचे व दि.११/९/२००७ रोजी जागा मालक दिपक कुलकर्णी यांचे जागा ताब्यात पत्रात नमुद केले आहे.सदर शासकीय कार्यालयाने म्हणजेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे वॉर्ड नं.१८ मधुन वॉर्ड नं.२४ बिल नं.१४५/०३ स्टेशन रोड येथे स्थलांतरीत झालेले असुन त्याप्रमाणे कर आकारणी होवून बिले बजावणेत आलेली आहेत.

तसेच एकात्मिक बाल सेवा योजना नगर (ग्रामीण) कार्यालय वॉर्ड नं.१८ वॉर्ड नं.२२ बिल नं.४ अ जिल्हापरिषद नविन प्रशासकीय इमारती मध्ये स्थलांतरीत झालेले असुन त्याप्रमाणे सन २००६/२००७ या आर्थिक वर्षात परिशिष्ठ अ फॉर्म वर नोंद घेवुन कर आकारणी होवून बिले बजावणी झालेली आहेत.

अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार तसेच अर्जासोबत देण्यात आलेल्या दस्तऐवजानुसार दि.१५/६/२०१८ रोजी समक्ष स्थळ पहाणी केली असता तसेच दस्तऐवजाची पडताळणी केलेली आहे.दाखल केलेल्या अर्जानुसार सन २००८/२००९ पासुन दोन्ही कार्यालयाची भाडेकरी कर आकारणी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम कलम २०(१) क नुसार कर आकाणी कमी करणेकामी अहवाल मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,सदर मिळकती मध्ये भाडेकरी आढळल्यास तात्काळ कर आकारणी करणे बाबत कार्यवाही करण्यात येईल.

आज दिनांक २१/६/२०१८रोजी समक्ष स्थळ पाहणी केली असता भाडेकरी आढळुन आलेले नाहीत तथापी वसुली लिपीक यांनी सादर कलेल्या प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वॉ.क्र.१८ वसुली लिपिक व कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार तसेच व.लि./ क.नि. यांचे दिनांक २१/६/२०१८ चे समक्ष पाहणी नुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर मा.सहा.मुल्य निर्धारण तथा कर संकलन अधिकारी यांचा वॉर्ड नं.१८ चे वसुली लिपीक व कर निरीक्षक यांनी समक्ष स्थळ पहाणी करून फोटोसह सादर कलेला अहवाल ,प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड" प्रकरण ८ कराधान नियम २०(१) क नुसार दुरूस्ती करणे उचित वाटते.आदेशार्थ सादर.

यावर मुखलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार व वरिल "अ" प्रमाणे दुरूस्ती करणे बाबत विभागाने निर्णय घ्यावा तथापी थकीत वसुली बाबत विभागाने दक्षता घेवून उचित निर्णय घेणे कराधान प्रकरण आढ नियम २०(१) क २०(२) प्रमाणे विभागाने उचित कार्यवाही करावी.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,दि.४/७/१८ अन्वये आदेशीत केल्याप्रमाणे सदरचे शासकीय कार्यालय वॉर्ड क्र.२४ स्टेशन रोड येथे स्थलांतरीत झ ालेले असून उक्त कार्यालयाची अभिपलेखा बी.नं.१४५/०३/ नोंद घेणेत आलेली असून कर आकारणी देखील करण्यात आलेली आहे.तसेच वॉ.क्र.२२ जुने एस.टी.स्टॅण्डसमोर नविन प्रशासकीय इमारत जिल्हा परिषद येथे स्थलांतरीत झालेली असून अभिलेखा बी.क्र.४ / अ वर नोंद घेण्यात आलेली आहे.सोबत परिशिष्ठ अ फॉर्म नक्कम व बिले जोडत असून आदेशीत केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड" प्रकरण ८ कराधान नियम २०(१) क नुसार मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर,प्रस्तावित "ब" प्रमाणे विभागाने उचित निर्णय घ्यावा .मुख्यलेखापरिक्षय यांची दि.४/७/१८ च्या अभिप्राया नुसार विभागाने खुलासा सादर केला दिसुन येत नाही.विभागाने उचित निर्णय घ्यावा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणी मा.मुख्यलेखाधिकारी यांनी दि.२४/७/२०१८ अन्वये आदेशीत केले प्रमाणे वॉ.क्र.१८ मधिल शासकिय कार्यालये अनुक्रमे वॉ.नं.२२ मध्ये बि.क्र.४ अ फॉर्म नोंद घेवुन कर आकारण्ीा करणेत आलेल आहे.तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या कार्यालयाची नोंद वॉ.क्र.२४ मध्ये स्थलांतरीत झालेले असून वॉ.क्र.२४ मध्ये बि.क्र.१४५/०३ स्टेशन रोड अ फॉर्म नोंद घेवून कर आकारणी करणेत आलेली आहे.मालमत्ताधारक यांनी कर आकारणी दुरूस्ती देणे बाबत दाखल केलेल्या अर्जानुसार दुरूस्ती देणे कामी तसेच दिनांक ४/७/२०१८ चे आदेशानुसार कराधान प्रकरण ८ नियम २०(१) क २०(२) प्रमाणे सुनावणी घेणे उचित होणार नाही .कारण मुळात संबंधित कार्यालयांना कर आकारणी झालेली आहे.तसेच सदर मिळकत रिकामी (भाडेकरू वापर नसल्याने ) कर आकारणी कमी करणे योग्य होईल सबब प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,फेरसादर प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत ) मधील अनुसुची "ड" प्रकरण कराधान २०(१) क (फ) नुसार विभागाने उचित निर्णय घेणेत यावा.

यावर मा.सहाय्य आयुक्त यांचाअभिप्राय की,अर्जदार यांच्या कडुन भाडेकरी नसल्याबाबत (कोणत्या वर्षापासुन नाही ) व भविष्यात भाडे कराराने जागा दिल्यास मनपास कळविण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र सादर करणेस कळविणे उचित होईल ,तथापी आदेशार्थ .

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्रायक की,उपरोक्त प्रतिज्ञपत्र घेवून सादर करावे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,श्री.किरण सुर्यकांत कुलकणी व इतर यांनी रू.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नमुद केले नुसार प्रतिज्ञापत्र सोबत सादर केलेले आहे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,उपरोक्त कार्यालयांनी अर्जदार यांच्या मालमत्तेचा ताबा सोडण्याच्या वर्षापर्यत २००७ पर्यत कर भरण केले आहे काय,याची खात्री करा.अर्जदार यांनी २००७ ते २०१८ पर्यत कर भरणा केला आहे काय याची शहानिशा करा.उपरोक्त बाबींच्या पुर्ततेनंतर सन २०१८-२०१९ पासुन सदर मालमत्तेवर कर आकारणीत सुधारणा करा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,उपरोक्त कार्यालयांनी अर्जदार यांच्या मालमत्तेचा ताबा सोडण्याचा वर्षापर्यत २००७/०८ पर्यत कराचा भरणा केलेला आहे.तसेच अर्जदार यांनी भाडेकरू कमी करणे बाबत दि.३/३/२००७,१५/११/२००७ व १७/०६/२००८ ,२४/०५/२०१८ रोजी अर्ज महानगरपालिकेत दाखल केलेले होते.

सदर अर्जानुसार मनपा रेकॉर्डवरील भाडेकरी नोंद आजतगायत कमी करण्यात आलेली नसल्याने अर्जदार यांनी २०१८ पर्यत कराचा भरणा केलेला नाही.

सबब अर्जदार यांच्या अर्जानुसार व वसुली लिपीक / कर निरीक्षक यांचे पहाणी अहवाला नुसार तसेच अर्जदार यांनी दिलेल्या प्रतिज्ञापत्रा नुसार सदर जागेत भाडेकरू नसलयाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची "ड" प्रकरण ८ कराधान नियम २०(१) क व २०(१) फ नुसार सन १९९५ ते २००८ अखेर रूपये ७४७३७/- वसुल करणेचे अटीवर व सन २००८ - २००९ पासुन अर्जदार यांचे अर्जानुसार परिशिष्ठ अ मध्ये भाडेकरू नोंद कमी करून निवासी दराने कर आकाणी करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्रायक की,१)मालमत्ता धारक यांनी भडेकरी अकर आकारणी दुरूस्त करणेसाठी २००७-२००८ रोजी अर्ज कलो आहे पान नं.१९ ते २३ (२) ३१/०५/२००८ रोजी मालमत्ता श्री.कुलकणी यांचे कडे हस्तांर केले बाबतचे प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यांत्रणा अहमदनगर यांचे पत्र आहे.(३) प्र.अ.यांचा २१/०६/२०१८ चा भाडेकरी नसल्याचा अहवाल आहे.(४) नविन आकारणी निवासी दराने करणे कामी तसेच मा.स्थायी समितीकडे निर्लेखित करणे कामी ,निर्लेखित करावयाची कराची रक्कम व शास्ती यांचा तक्ता सादर करावा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,अर्जदार यांनी सन २००७-२००८ या वर्षात भाडेकरी कर आकारणी कमी करणेसाठी अर्ज दिलेला आहे.समक्ष पाहणी अहवालात सदर मिळकतीत भाडेकरी नाही.अर्जदाराचे अर्जानुसार अद्यापर्यत बिल दुरूस्त झालेले नाही.सद्यस्थीतीत सन २०२१-२०२२ अखेर संबंधीत मालमत्ता धारकांकडे मालमत्ता कर व इतर कराची मुळ थकबाकी रू.८०६८३६ व शास्ती २ % दंडात्मक शास्तीची रक्कम रू.१२३८४१८/-अशी एकुण रू.२०,४५,२५४/- एवढी थकबाकी आहे.

मा.तत्कालीन उपायुक्त(कर) आदेशानुसार सन २००७/२००८ ते २०२१/२०२२ अखेर मालक (रहिवास) वापरानुसार दुरूस्त कर आकारणी करून संबंधीत मिळकत धारकाकडे मालमत्ता कर व इतर कराची मुद्दल रू.२,६५,८०९/- व २ टक्के दंडात्मक शास्ती रू.४,५९,७०३/- अशी एकुण रक्कम ७,२५,५१२/-वसुल पात्र रक्कम निघत आहे.त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे.महाराष्ट्र प्रांतिक म.न.पा.अधिनियम कराधान प्रकरण ८ नियम २०(१) क अन्वये अर्जदारास बिल दुरूस्ती झालेनंतर शिल्लक राहिलेली चुकीची आकारणीची रक्कम रू.५,४१,०२७/- वसुल न होणारी असलेने महाराष्ट्र प्रांतिक म.न.पा.अधिनियम १९४९ मधिल कराधान १५२ अन्वये निर्लेखित करणे कामी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत तसेच चुकीचे आकारणीवर होणारी २ टक्के दंडात्मक शास्तीची रक्कम

रू.७,७८,७१५/- ही महाराष्ट्र प्रांतिक म.न.पा.अधिनियम १९४९ मधील अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ५१ नुसार कमी करणेस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी मिळकतीचे मालक श्री.कुलकर्णी यांना ३१/५/२००८ रोजी यांना ताबा दिल्याचे त्यांचे १७/६/२००८ चे पत्रा वरून दिसुन येते.सन २००८-२००९ पासून भाडेकरी आकारणी कमी करणेस हरकत नाही.

तरी प्रभाग अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव सन २००८-२००९ पासुन अ नुसार मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" "ब " प्रमाणे निर्लेखित करणे कामी मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविणेस व शास्तीकमी मनपा अधि१९४९ मधील कराधान प्रकरण ८ मधील कलम ५१ अन्वये बील दुरूस्तीस मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) चर्चा , चर्चा केली भाडेकरी नसताना दुरूस्त बिल व उर्वरित रक्कम प्रस्ताव निर्लेखनासाठी रू,१३,१९,७४२/- चा प्रस्ताव स्थायी कडे सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रभाग अधिकारी समक्ष चर्चा करणे ,उशिर करणेचे कारण काय? खुलासा करावा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,संबंधीत मिळकत धारक श्री.दिपक सुर्यकांत कुलकणी यांचे मालमत्तेस अनुक्रमे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व एकात्मिक सेवा योजना हे दोन सरकारी कार्यालय सन २००७-२००८पर्य त होते २००८-२००९ मध्ये संबंधीत कार्यालयाने सदरील जागा सोडली व जागा मालक दिपक सुर्यकांत कुलकणी यांच्या ताब्यात जागा दिले बाबतचे कार्यालयीन पत्र दिलेले होते सन २००८-२००९मध्ये सदर वॉर्डचे काम पहाणारी तत्कालीन वसुली लिपीक (मदतनीस) हे मयत झालेले आहेत.

संबंधीत मिळकत धारकाने दि.२५/५/२०१८ रोजी अर्ज देवून कळविले की,सन २००८-२००९ पासुन दोन्ही सरकारी कार्यालयाची भाडे आकारणी कमी करून दुरूस्त बिल देणेबाबत अर्ज दिलेला आहे.सदर अर्जावर त्वरीत प्रस्ताव सादर केलेला आहे.सदर प्रस्तावावर मा.उपायुक्त (कर) यांनी संबंधीत मिळकतीची मालक (रहिवास) वापरानुसार दुरूस्त कर आकारणी करून शिल्लक राहिलेली मालमत्ता व इतर कराची मागणी सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार मालमत्ता कर व इतर कराची निर्लेखित करणे आदेशानुसार केलेला फेरसादर प्रस्ताव व मा.स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समितीसभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्र.१३ नुसार चर्चा

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणी पट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री.दिपक सुर्यकांत कुलकर्णी प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.४ बिल क्र.६०२ यांचे मालमत्तेमध्ये शासकिय कार्यलयास भाडे तत्वाने देण्यात आले होते.सदर कार्यालय स्थलांतरीत झाल्याने सदर मालमत्तेवर करण्यात आलेली भाडे आकारणी रद्द करुन जादा आकारणीची रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

**विषय क्रमांक : ३१** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. विलास प्रभाकर मुंगी, रा.सर्व्हे नं.१८३/१ रेणुकादेवी मंदिर शास्त्रीनगर, केडगाव,अ.नगर येथे प्रभाग समिती क्रमांक ४ वॉर्ड नं.३४ बिल नं.Z४३४११७४०२ या श्री महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी शास्त्रीनगर केडगाव ही मालमत्ता (गोडाउन ) बंद असल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये २ वर्षाचा २/३ परतावा मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ वसुली विभाग.

वरिल विषयांस अनुसरून विनंती पुर्वक रिपोर्ट वॉर्ड क्र.३४ चे वसुली लिपिक यांज कडून देण्यात येतो की,श्री.महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनीचे प्रो.प्रा.श्री.विलास प्रभाकर मुंगी यांनी अर्ज देवून कळविले आहे की,सर्व्हे नं.१८३/१ शास्त्रीनगर केडगांव वॉर्ड क्र.३४ मालमत्ता क्रमांक z४३४११७४०२ ही मालमत्ता सन २०१४-२०१५ पासुन बंद (पडीक) असुन त्या मिळकती पासुन कुठलेही उत्पन्न मिळत नाही.आपण केलेली आकारणी ही खुपच जास्त आहे.ही मालमत्ता पुर्णपणी पडीक सदरात मोडले त्यावर कोणतेही उत्पन्न नाही.त्यामुळे आकारणी नाममात्र करण्यात यावी.व बिलावरील नांवे रसाळ ,कुटे,विलासराव मुंगी (श्री.महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी ) शास्त्रीनगर केडगांव असे नमुद करता अन्य कोणाचाही आता कंपनीशी संबंध नाही १/४/२०२० पासुन सर्व मालकी हक्म माझ्याकडेच होती व आहे.तरी सदर नोंदी (रसाळ ,कुटे) कमी करून बिल हे श्री.विलास प्रभाकर मुंगी श्री.महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी प्रो.पा.असे बदल करण्यात यावी सदर मालमत्तेचे दुरूस्त बिल हे मार्च २०२२पुर्वी संपुर्ण भरणा करता येईल असे अर्जदार यांनी कळविले आहे.

अर्जदार यांचे अर्जा अनुशंशीक महानगरपालिका दप्तरी व प्रत्यक्ष दर्शी विभाग प्रमुख यांचे समवेत स्थळ पाहाणी केली असता असे निदर्शनास येते की,सदरची मालमत्ता ही संपुर्ण बंद (पडीक) स्वरूपात असून त्या मालमत्तेचे दरवाजे नादुरूस्त झालेले आहे.यापूर्वी ही अर्जदार यांनी मालमत्ता बंद असले बाबत २/२ परतावा दि.२२/२/२०१७ व दि.३१/८/२०१९ ला अर्ज देवून त्यावर ऑफिस रिपोर्ट देवून मा.स्थायी समिती सभे मध्ये विषय घेवून सर्व साधारण करावर २/३ परतावा रक्क्म रूपये १,८९,९६०/- देण्यात आला आहे.

मंजूरी रिपोर्ट प्रमाणे अर्जदार यांना सन २०१६ते २०२० अखेर संपुर्ण कराचा भरणा देखील केलेला आहे.अर्जदार यांनी सन २०२०-२१ व २०२१-२२ असे २ वर्षाचा मालमत्ता बंद असल्यामुळे मालमत्ता करावर २/३ परतावा मिळण्याबाबतची मागणी केलेली आहे.तसेच २ वर्षाचा २/३ परतावा मिळाल्यास मंजूर रिपोर्ट प्रमाणे येणारी रक्क्म एक रकमी करण्यास मालमत्ता धार यांनी सहभागी दर्शविलेली आहे.

अर्जदार यांनी केलेली बंद (पडीक ) मालमत्ता असल्याने मालमत्ता धारक यांना महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कराधान नियम कलम ५६ (२) अन्वये सदर मिळकतीस २/३ रक्कम ही सर्वसाधारण कर कमी करणेस तरतुद आहे.सदर मिळकतीचा सर्वसाधारण कर रक्कम रूपये २,८४,९४१/- असुन २/३ परतावा प्रतिवर्षी रक्कम रूपये १,८९,९६०/- कमी करावी लागेल याप्रमाणे सन २०२०-२१ व २०२१-२२ अशी दोन वर्षाची २/३परतावा रक्क्म रूपये ३,७९,९२०/-परतावा दयावा लागेल.सदर मालमत्ता धारकाकडे ३१ जानेवारी २०२२ अखेर शास्तीसह

रक्कम रूपये ८,२९,६२९/- ऐवढी थकबाकी आहे.दोन वर्षाची २/३ परतावा रक्कम ३,८९,९२०/- वजा जाता शिल्लक रक्कम रूपये ४,४९,७०९/- भरून घ्यावी लागेल व मालमत्ता कर आकारणी बिलावर रसाळ,कुटे हे नांव कमी करून श्री.विलासराव प्रभाकर मुंगी (श्री.महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी प्रो,प्रा.) अशी दुरूस्ती बिल करण्यास सदरचा रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक व केडगांव विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक ,विभाग प्रमुख यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिळकतीचा वापर बंद असलेस महाराष्ट्र प्रांतीक मपना अधिनियम १९४९ मधील कराधान प्रकरण ८ कलम ५६(२) अन्वये संबंधित अर्जदारास सर्वसाधारण करात २/३ परतावा देणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक मुल्य निर्धारक तथ कर संग्राहक अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचे पाहणी अहवालानुसार सदरचे गोडावून बंद असल्यामुळे अधिनियमातील तरतुदी नुसार विभागाने सादर केलेला प्रस्ताव "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समितीचा ऑफिस रिपोर्ट व मालमत्ता कर आकारणी बीलावर नांव बदलावयाची संबंधित जागेचा पुरवा सादर करावा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,मा.संहाय्यक आयुक्त यांचे दि.८/२/२२ चे आदेशानुसार मा.स्थायी समिती सभा क्र.०५ विषय क्र१०३ दि.१३/११/२०१९ ची ठरावाची प्रत सोबत जोडणेत येत आहे.

तसेच मालमत्ता धारकाचे नांव बदलणे बाबत अर्जदाराने शॉप ॲक्ट लायसन्स बॅकेचे पत्र इत्यादी तत्सम कागदपत्रे सोबत जोडलेले परंतु सदर मिळकतीचा ऑनलाईन सात बारा उतारा काढला असता सदर उता-यावर महालक्ष्मी वेअर हौंसिंग कंपनी ,अ.नगर श्रीकांत गणेश रसार,चंद्रकांत त्रिंबकराव कुटे,भास्करराव किसनराव म्हस्के,विलास प्रभाकर मुंगी या प्रमाणे नांवे आहेत.त्या मुळे अर्जदाराचा नाव बदलणे बाबत अर्ज दप्तरी दाखल करणेस व मिळकतीचा वापर बंद कसलेने सर्वसाधारण करात २/३ परतावा देणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,मना अधि १९४९ मधील कराधान प्रकरण ८ नियम ५६(२) अन्वये सामान्य कराचा २/३ रक्कम कमी करणेची तरतुद आहे.परंतु सदर मालमत्ता कराची बिले यापुर्वीच दिली असल्यामुळे सदर बीलावरील परताव्याची रक्कम (२ वर्षे सन २०२०-२१ व २०२१-२२ ) निर्लेखित करणे आवश्यक आहे.त्यानुसार परताव्याची रक्कम निर्लेखित करण्यासाठी मा.स्थायी समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करावा व उर्वरित रक्कम भरून घ्यावी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

विषय पत्रिकेतील विषय क्र.१३ नुसार चर्चा

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणी पट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषय मंजूर करण्यात यावेत.

मा. श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.सर्व निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- आजच्या विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे सर्व विषयांच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री. विलास प्रभाकर मुंगी, रा.सर्व्हे नं.१८३/१ रेणुकादेवी मंदिर शास्त्रीनगर, केडगाव,अ.नगर येथे प्रभाग समिती क्रमांक ४ वॉर्ड नं.३४ बिल नं.Z४३४११७४०२ या श्री महालक्ष्मी वेअर हौसिंग कंपनी शास्त्रीनगर केडगाव ही मालमत्ता (गोडाउन ) बंद असल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये २ वर्षाचा २/३ रक्कम कमी करून,परताव्याची रक्कम सन २०२०-२१ व २०२१-२२ या दोन वर्षाची रक्कम निर्लेखित करणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.सचिन शिंदे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

---

**विषय क्रमांक : ३२** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२१-२०२२ या सालाचे वार्षिक दर ठरविणे काम गट क्र.४ क्रेन भाडयाने लावणे,जे.सी.बी.,पोकलेन भाडयाने लावणे इत्यादी कामी प्राप्त निविदा दरास मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग.

**संदर्भ :-** १.ई - निविदा क्र.७३८४०६-१

२.दि.२४/११/२०२१ रोजीचा स्क्रीन शॉट

३.दि.०७१२/२०२१ रोजीचा आर्थिक लिफाफा

४.दि.१५/१२/२०२१ रोजीची दरांची वाटाघाटी

५.मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांचे दि.१५/१२/२०२१ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट सादर की,शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२१ -२०२२ या सालाचे वार्षिक दर ठरविणे साठी गट क्र.४ क्रेन भाडयाने लावणे,जे.सी.बी. पोकलॅन भाडयाने लावणे या कामाची ई निविदा क्र.७३८४०६-१ दि.१८/११/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली .त्यानुसार दोन निविदाधारकांनी निविदा प्राप्त झाली.

१.श्री.नंदकिशोर गणपत धाडगे,अहमदनगर

२.मे.सुनिल सेवा,अहमदनगर

दि.०७/१२/२०२१ रोजी व्यापारी लिफाफा उघडण्यात आला.त्यामध्ये श्री.नंदकिशोर गणपत धाडगे यांनी भरलेली निविदा अपुर्ण असल्याने दुसरे निविदाधारक श्री.सुनिल सेवा,अहमदनगर यांचेकडून प्राप्त दरांचे वाटाघाटी साठी दि.१५/१२/२०२१ रोजी बोलविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने मा.उपयुक्त यांचे दालनामध्ये दरांची वाटाघाटी झाली असून संदर्भिय पत्र क्र.५ अन्वये वाटाघाटी अंती मान्य झालेल्या दरांचा तक्ता जोडलेला आहे.

करिता

१)वाटाघाटी दरम्यान मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांचे दरांस मंजुरी मिळणेस

२) निविदा अटी शर्ती नुसार अनामत रक्कम भरणे,रितसर करारनामा करून देणे विषयी सबंधित ठकेदार यांना पत्र देणेस

३) वरील प्रमाणे पुर्तता केल्यानंतर विषयांकीत कामासाठी ठेकेदारास कार्यारंभ आदेश देणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालान्वये मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,वाटाघाटीच्या तक्त्यावर छाननी समितीच्या प्राधिका-याने स्वाक्षरी सह फेरसादर करावे.

| अक्र. | विषय | युनिट | सुनिल सेवा यांचे प्राप्त निविदा दर | सुनिल सेवा यांचे वाटाघाटी दरम्यान मान्य दर रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | क्रेन भाडयाने लावणे पाईप उचलणे,पाईपची वाहतुक करणे इत्यादी कामासाठी १ प्रति तास | प्रति तास | ३५०० | २९०० |
| २ | जे.सी.बी.मशिन भाडयाने लावणे पाईप लाईन खादाई करणे भोवतालची खोदाई कणे इत्यादी कामासाठी प्रति महिना | प्रति महिना | २,२५,००० | १,९४,५००/- |
| ३ | जे.सी.बी मशिने भाडयाने लावणे पाईप लाईन खोदाई करणे भोवतालची खोदाई करणे इत्यादी कामासाठी | प्रति महिना | ११००००/- | ९४०००/- |
| ४ | जे.सी.बी.मशिन भाडयाने लावणे पाईप लाईन खोदाई करणे भोवतालची खादाई करणे इत्यादी कामासाठी | प्रति तास | ११९०/- | ११४०/- |
| ५ | जे.सी.बी.मशिन भाडयाने लावणे पाईप लाईन खोदाई करणे भोवतालची खादाई करणे इत्यादी कामासाठी | प्रति तास | ११९० | ५९०/- |
| ६ | पोकलॅन मशिन २१० भाडयाने लावणे | प्रति तास | ३५००/- | २५५०/- |
| ७ | ट्रॅक्टर ब्रेकर सिंगल निडल मशिन भाडयाने लावणे ,पाईप लाईन भोवतालची खोदाई करणे,कॉक्रीट,डांबर ,हार्ड मुरूम खडक खोदाई इत्यादी कामासाठी | प्रति तास | १५००/- | १४५०/- |
| ८ | ट्रॅक्टर ब्रेकर डबल निडल मशिन भाडयाने लावणे पाईप लाईन भोवतालची खोदाई करणे ,क्रॉक्रीट,डांबर,हार्ड मुरूम खडक खोदाई करणे इत्यादी कामासाठी | प्रति तास | २५००/- | २३५०/- |
| ९ | इलेक्ट्रीक हॅण्ड ब्रेकर मशिन भाडयाने लावणे पाईप लाईन भोवतालची खोदाई करणे,कॉक्रीट,डांबर,हार्ड मुरूम खडक खोदाई करणे इत्यादी कामासाठी | प्रति तास | १२००/- | ११००/- |

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,वाटाघाटी दि.१५/१२/२०२१ चे उपस्थिती बाबत पान.न.३० प्रत जोडली आहे.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,आक्षेपाबाबत विभागाने पुर्तता केल्या नुसार प्रस्तावित "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची यांचा अभिप्राय की,प्रति महिना दर मागविणे म्हणजे प्रति दिन काम करणे अपेक्षीत आहे का? जर तसे असेल तर किती तास काम करते अपेक्षित आहे.प्रति तास सरासरी काम दर अपेक्षीत आहे.

बाजारीतील दर तपासुन घेणे.

यावर शाखा अभियंता यांचा अहवाल की,फेरसादर.

१)जे.सी.बी.मशीन रूपये - ११४०/- प्रति तास

x६ दिवसाचे तास

-------------

६८४०/- रूपये

x ३० दिवसांचे

-------------------

एकुण रूपये -२,०५,२००/- प्रति महिना

तरी जे.सी.बी.ह अत्यावश्यक सेवे करीता तातडीच लाबतो व तासाने घेतल्यास त्याची किंमत अंदाज रू.२,०५,२००/- होते (अंदाजीत)

तरी प्रती महिन्याने घेतल्यास रू.१,९४,५००/- डिझेलसह इतके येते.तसेच महिन्यावर घेतल्यास जे.सी.बी.महानगरपालिकेस बांधील राहतो.

त्यामुळे जे.सी.बी.महिन्याने घेणे कामाच्या दृष्टीने संयुक्तीक राहिल.एक मशिन महिन्याने घेणे व गरज पडल्यास इतर जे.सी.बी प्रति तास प्रमाणे लावणे योग्य वाटते.चारही झोन मध्ये आवश्यकते नुसार दैनंदिन काम आहे.

सदरील दर हे दर मार्केट Rate नुसार पडताळणी करूनच वाटाघाटी करून दर निश्चित केले तथापी मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालान्वये मान्यतेस्तव सादर,तथापी मा.स्थायी समितीकडे मान्यतेस्तव सादर करणे योग्य वाटते.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२१-२०२२ या सालाचे वार्षिक दर ठरविणे काम गट क्र.४ क्रेन भाडयाने लावणे,जे.सी.बी.,पोकलेन भाडयाने लावणे इत्यादी कामी प्राप्त निविदा दरास मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.सभापती साहेब :- या विषयाबाबत सविस्तर माहिती सांगा.

जल अभियंता श्री.निकम :- ,शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२१ -२०२२ या सालाचे वार्षिक दर ठरविणे साठी गट क्र.४ क्रेन भाडयाने लावणे,जे.सी.बी. पोकलॅन भाडयाने लावणे या कामाची ई निविदा क्र.७३८४०६-१ दि.१८/११/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार दोन निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.दरांची वाटाघाटी अंती दर निश्चीत करण्यात आलेले आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभाग ,घनकचरा विभाग इतर विभागाकडील भाडेतत्वावर लावण्यात आलेल्या ा JCB मशिन च्या दरानुसार दर मंजूर करून या संस्थेस काम देता येईल का?

जल अभियंता श्री.निकम :- सदरच्या निविदेमध्ये स्पर्धा झाल्या मुळे या दरानुसार दर मंजूर करता येणार नाही.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२१-२०२२ या सालाचे वार्षिक दर ठरविणे.गट क्र.४ क्रेन भाडयाने लावणे,जे.सी.बी.,पोकलेन भाडयाने लावणे या कामाची ई निविदा क्र.७३८४०६-१ मधील प्राप्त निविदा धारक मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांचे दरांस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २०२१-२०२२ या सालाचे वार्षिक दर ठरविणे.गट क्र.४ क्रेन भाडयाने लावणे,जे.सी.बी.,पोकलेन भाडयाने लावणे या कामाची ई निविदा क्र.७३८४०६-१ मधील प्राप्त निविदा धारक मे.सुनिल सेवा,अहमदनगर यांचे दरांस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०२**

**विषय क्रमांक : ३३** **दिनांक :- २६/०५/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक-०५ मधील वैदुवाडी येथील व्यायाम शाळा व मंगल कार्यालय निर्लेखीत करणे व पाडणे बाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

**संदर्भ :-** १. मा.नगरसेविका सौ.सोनाबाई तायगा शिंदे ,प्रभाग क्र.५ यांचे दि.२५/०४/२०२२ रोजीचे पत्र.

२. इंजि.वैभव एस फिरोदिया,यांचे दि.५/७/२०२१ चे स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेट प्राप्त दि.५/५/२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार रिपोर्ट की,संदर्भिय पत्रानुसार मा.नगरसेविका सौ.सोनाबाई तायगा शिंदे यांचे इकडेस पत्र प्राप्त झालेले असून त्यांनी प्रभाग क्र.५ मधील वैदुवाडी येथील अंदाजे २५ ते ३० वर्षा पुर्वीची व्यायाम शाळा व मंगल कार्यालय असून ते सध्या धोकेदायक झालेले आहे.ते पाडण्यात यावे व व्यायाम शाळा मंजूर झालेली असून जुनी तालीम पाडून त्याचे ठिकाणी नविन व्यायाम शाळा बांधण्यात यावी जेणे करून प्रभागातील नागरिकांना चांगली सुविधा उपलब्ध होईल असे इकडेस कळविले आहे.

त्यानुसार सदर जागेची पाहणी केली असता सद्यस्थितीत ओपन स्पेसमध्ये यापुर्वी तात्कालीन नगरपरिषद असतांना अंदाजे २५ ते ३० वर्षापुर्वी व्यायाम शाळा व मंगल कार्यालयाचे बांधकाम करण्यात आलेले होते.सद्यस्थितीत सदर व्यायाम शाळा व मंगल कार्यालय हे जिर्ण व पडीक झालेली आहे.काही वर्षापासून सदर व्यायाम शाळेची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली असून सदर ठिकाणीची परिस्थिती पाहता सदरील इमारत ही धोकादायक झालेली आहे.ही वास्तु पडीक व जिर्ण झाल्याने अचानकपणे सदरील इमारती कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यतेमुळे या ठिकाणी व्यायाम शाळेचा व समाज मंदिराचा ब-याच वर्षापासून वापर होत नाही.या ठिकाणी व्यायाम शाळेच्या कडेने असलेल्या रस्त्याने जेष्ठ नागरिक व महिला फिरत असतात तसेच लहान मुंले या परिसरात खेळत असतात.त्यामुळे सदरील इमारत अचानकपणे कधीही पडून जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे या परिसरातील नागरिक ही व्यायाम शाळा पाडणेबाबत मा.नगरसेवक यांच्याकडे वारंवार मागणी करत आहेत.

त्यानुसार इकडील विभागाकडून नियमानुसार स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी ऑडीट करणेसाठी पत्राव्दारे इंजि.वैभव एस.फिरोदिया ,कळविण्यात आलेले होते.त्यानुसार संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये इकडेस Structural Stability certificate प्राप्त झालेला असुन त्यांनी इकडेस खालील नमुद प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

I Vaibhav shrimal Firodiya (Chartered Engineer & Structural Auditor) certify that the Samaj & Vyayam Shala is structurally unsafe& unstable and its structural candition has deteriorated beyond the stage of economaic repairs.The Samaj Mandir and Vyayam Shala needes to be demolished.

या मुळे सदर नादुरूस्तव्यायाम शाळा व मंगलकार्यालय ,वापरात नसल्यामुळे मनपा मार्फत निर्लेखीत करणेसाठी व पाडणेसाठी रिपोर्ट मा.स्थायी समिती समोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे उप अभियांता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार पुढील कार्यवाहीस्तव व निर्णयासाठी मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक-०५ मधील वैदुवाडी येथील व्यायाम शाळा व मंगल कार्यालय निर्लेखीत करणे व पाडणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे सभेमध्ये वाचन करण्यात आले.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्र.५ मधील वैदुवाडी येथील अंदाजे २५ ते ३० वर्षा पुर्वीची व्यायाम शाळा व मंगल कार्यालय असून ते सध्या धोकेदायक झालेली असल्याने तसेच स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी ऑडीटर इंजि.वैभव एस.फिरोदिया यांचा अहवालानुसार सदर व्यायाम शाळा व मंगलकार्यालय वापरात नसल्यामुळे महानगरपालिकेमार्फत निर्लेखीत करण्यास व पाडण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपार्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपार्ट नुसार प्रभाग क्र.५ मधील वैदुवाडी येथील अंदाजे २५ ते ३० वर्षा पुर्वीची व्यायाम शाळा व मंगल कार्यालय असून ते सध्या धोकेदायक झालेली आहे.सद्यस्थितीत सदर व्यायाम शाळा व मंगल कार्यालय हे जिर्ण व पडीक झालेली आहे.काही वर्षापासून सदर व्यायाम शाळेची मोठया प्रमाणात  दुरावस्था झालेली आहे. सदरील इमारत ही धोकादायक झालेली असल्याने अचानकपणे इमारती कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यतेमुळेजिवितहानी होण्याची शक्यता असल्याने तसेच समाज मंदिराचा ब-याच वर्षापासून वापर होत नसल्याने व स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी ऑडीटर यांच्या अहवालानुसार सदर व्यायाम शाळा व मंगलकार्यालय वापरात नसल्यामुळे महानगरपालिकेमार्फत निर्लेखीत करण्यास व पाडण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपार्ट मंजूर.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका